Pune Police

प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - २९/०३/२०१९

**वानवडी पोलीसांनी पुणे शहर व परिसरात वाहन चोरी, घरफोडी चोरी करणाऱ्या अट्टल सराईत गुन्हेगारांना पकडुन त्यांचेकडुन २० गुन्ह्यांची उकल केली.**

दिनांक २८/०३/२०१९ रोजी वानवडी पोलीस ठाण तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे वानवडी पोलीस ठाणे हद्दीत घर फोडी व वाहनचोरीस प्रतिबंध करणेकरीता रात्रौ पेट्रोलिंग करीत असताना पो.शि.शिरीष गोसावी व पो.शि.नासीर देशमुख यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, घरफोडी करणारे दोन इसम एका ग्रे रंगाचे मो.सा.वरुन रामटेकडी इंडस्ट्रियल एरियामध्ये आले आहेत त्यांचे गाडीला नंबर नाही अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने वरील स्टाफच्या दोन टिम करुन रामटेकडी इंडस्ट्रियल एरियात नमुद इसमांचा शोध घेवुन त्या दोन इसमांना त्यांचेकडील ग्रे रंगाचे मो.सा.सह रामटेकडी इंडस्ट्रियल एरियामधील स्मशानभुमी जवळ त्यांना ताब्यात घेण्यात आले त्यापैकी एकाचे नाव अमरसिंग जगरसिंग टाक वय २०, रा. बिल्डींग नंबर ३३ नविन म्हाडा वसाहत हडपसर पुणे मुळ गांव एलबेसनगर रायचुर कर्नाटक व दुसरा विधीसंघर्षित बालक आहे. त्यांचेकडे मिळुन आलेली डि.ओ.मोपेड गाडी ही वानवडी पोलीस ठाणे कडील गुन्हा रजि.नंबर ९४/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९ मधील एकास नमुद गुन्ह्यात अटक करुन व विधीसंघर्षित बालकास ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्यांचेकडुन एकुण २० गुन्ह्याची उकल झाली असुन त्यामध्ये ४ चारचाकी गाड्या (तवेरा, युको, सॅन्ट्रो, झेन) व १२ दुचाकी गाड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांनी वरील गाड्यांचा वापर करुन लोणीकाळभोर, बिबवेवाडी, कोंढवा, व सहकारनगर भागातील सोसायट्यांमधील बंद फ्लॅट व दुकाने रात्रीच्या वेळी फोडुन करण्यात आलेल्या घर फोडीच्या ०४ गुन्ह्यांची उकल झाली आहे. अटक आरोपी व विधिसंघर्षित बालकाकडुन वानवडी, कोंढवा हडपसर, स्वारगेट, चंदननगर, शिवाजीनगर, वारजे, लोणी काळभोर, यवत या परिसातील १६ वाहने (दुचाकी, चारचाकी) व ०४ घरफोडीतील मुद्देमाल असा एकुण १४,१४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपी व विधीसंघर्षित बालकाचे इतर फरारी साथीदार पवित्रसिंग ऊर्फ पैतर गब्बरसिंग टाक यांचा शोध सुरु आहे. अटक आरोपी याचेवर रायचुर कर्नाटक येथे चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी सो, अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग, पुणे शहर, श्री प्रकाश गायकवाड सो, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५, पुणे शहर, श्री नागनाथ वाकुडे, सहा.पोलीस आयुक्त वाहतुक विभाग, पुणे शहर (प्रभारी सहा.पो.आयुक्त वानवडी विभाग) श्री सुनिल भोसले, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री रावसाहेब भापकर पोलिस निरिक्षक (गुन्हे), वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक श्री दत्ताजीराव मोहिते, सपोफौज. रमेश भोसले, पो.हवा.राजु सासगे, पो.हवा.निसार खान, पो.ना.ज्ञानेश्वर गिरमकर, पो.ना.सुदर्शन बोरावके, पो.शि.सुधिर सोनवणे, पो.शि. योगेश गायकवाड, पो.शि.प्रतिक लाहिगुडे, पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.महेश कांबळे, कानिफनाथ कारखेले यांचे पथकाने केली आहे.


वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर
Ph.:020-26824981